# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

३४२ - २३ दिनांक : - ०४/१०/२०२३

## बेकायदेशीर अग्निशस्त्र कब्जात बाळगणाऱ्या आरोपीस अग्निशस्त्रासह ताब्यात घेण्यात गुन्हे शाखा कक्ष - 3 विरार यांना यश

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत बेकायदेशिर अग्निशस्त्र बाळगणारे आरोपींची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन गुन्हयांना पायबंद घालणेबाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने वरीष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ पोलीस पथकाने गुप्त बातमीदार यांचेकडून मिळालेल्या खात्रीशीर माहीतीच्या आधारे कारवाई करुन इसम नामे अब्दुल करीम हारुण शेख वय २५ वर्षे, रा. बटर पाडा, मौजे पेल्हार, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर यास दिनांक ०३/१०/२०२३ रोजी ताब्यात घेतले असता त्याचे कब्जातुन एक देशी बनावटीचे लोखंडी धातुचे पिस्तुल (कट्टा) व ०१ जिवंत काडतुस असा ५,१००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन त्याचे विरुध्द सरकारतर्फे पो.अं/ १३१३७ सुमित साहेबराव जाधव नेम. गुन्हे शाखा कक्ष -३ यांनी फिर्याद दिल्याने पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर व कलम ८८६/२०२३, भा.ह.का. कलम ३, २५ (१), (क) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) (३)/१३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात असुन आरोपीत यास पुढील कारवाई करीता पेल्हार पोलीस ठाणे येथे वर्ग करण्यात आले आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. अभिजीत टेलर, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, म.सु.ब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष -३ तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.